# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. District (जिल्हा): नांदेड | P.S.(ठाणे): मारखेल
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0234 | Year (वर्ष): 2024
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 21/10/2024 19:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): मंगळवार
Time Period (कालावधी): पहर 5
Date From (दिनांक पासून): 02/07/2024
Date To ( दिनांक पर्यंत): 02/07/2024
Time From (वेळेपासून): 13:52 बजे
Time To (वेळेपर्यंत): 13:52 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 21/10/2024 Time (वेळ): 19:03 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):
Entry No. (नोंद क्र.): 019
Date & Time (दिनांक आणि वेळ): 21/10/2024 19:03 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम
Beat No. (बिट क्र.):
(b) Address (पत्ता): पो स्टे मरखेल ,देगलुर

(c) In case, outside the limit of this Police Station, then
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):



Scanned with CamScanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): शंकर लक्ष्मणराव पाटील

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मरतोळी ,देगलुर ,मारखेळ ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मरतोळी ,देगलुर ,मारखेळ ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय): शेतकरी

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9422701001

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संकेत वसंतराव दिघे | | | 1. पोलीस स्टेशन मरखेल ,देगलुर मारखेळ ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिपक प्रल्हादराव जोगे | | | 1. पोलीस स्टेशन मरखेल ,देगलुर मारखेळ ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 3 | शरद रामदास शेरीकर | | | 1. मरखेल ,देगलुर ,मारखेळ , नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यारा)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोलीस स्टेशन मरखेल, ता.देगलूर जि. नांदेड

दिनांक 21/10/2024

मी शंकर लक्ष्मनराव पाटील, वय 45 वर्ष, व्यवसाय शेती, रा.मरतोळी ता.देगलूर जि.नांदेड मो.क्र. 9422701001 आधार कार्ड नं..264970855260 . मी समक्ष पोलीस स्टेशन मरखेल येथे येयून फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहतो मौ.जे मरतोळी शिवारात गट क्रमांक 101/1 क्षेत्रफळ एकूण एक हेक्टर शेत जमीन ही माझी मालकीची आहे. सदरची शेती करून मी माझे कुटुंब उपजिविका भागवतो.

दिनांक 23/09/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड कार्यालय येथे येवून मी स्वतः माझा तक्रारी अर्ज दिला आहे. की माझे गावातील नामदेव धर्मा अंदलवाड व इतर लोक माझे शेत जमीनी बाबत वाद घालत होते. व शेती कामकाजात अडचण करत असल्यामुळे मी त्याच्या विरूध्द दिवाणी न्यायालय देगलूर येथे दावा दाखल केला होता. त्यावरून दिवाणी न्यायालय देगलूर यानी दिनांक 26/06/2024 रोजी सदरील नामदेव अंदलवाड व इतर लोकाविरूध्द मनाई हुकूमचा आदेश दिला होता. मा.न्यायालयानी दिलेला मनाई आदेश घेवून मी दिनांक 1 जूलै 2024 रोजी पोलीस स्टेशन मरखेल येथे गेलो होतो. त्यावेळी ठाणे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक संकेत दिघे साहेब हे नव्हते त्या ठिकाणी बीट जमादार जोगे साहेब होते. त्यांच्याकडे मी न्यायालयाचे आदेश व माझे विरोधातील लोक श्री नामदेव अंदलवाड व ईतर लोकांनवर प्रतिबंधक कारवाई करावी म्हणुन अर्ज दिला. तेंव्हा जोगे साहेब मला म्हणाले अर्ज मी साहेबा समोर ठेवतो आणि साहेब काय सांगतात ते तुम्हाला सांगतो असे सांगितले.

त्यानंतर दिनांक 02/07/2024 रोजी सकाळी 10 वाजुन 47 मिनीटांनी जोगे साहेबांचा फोन आला की पोलीस स्टेशनला या असे कळविले. त्यांनतर मी व माझा पाहुणा विठ्ठल टोळभागे असे आम्ही दोघे पोलीस स्टेशन मरखेल येथे गेलो. तेंव्हा सहायक पोलीस निरीक्षक दिघे साहेब हे पोलीस स्टेशन मध्ये हजर होते. मी साहेबांना भेटलो तेंव्हा दिघे साहेब म्हणाले काय विषय आहे तेंव्हा मी सागितले की आमच्या जमिनीचा वाद आहे माझ्याकडे कोर्टाचा मनाई हुकमाचा आदेश आहे. संबधित लोकांना प्रतिबंध करावे नाहीतर ती मंडळी भांडणे करतील. दिघे साहेब म्हणाले या विषयाशी आमचा काय संबध आम्ही काय म्हणुन कार्यवाही करावी. आम्हाला काय करायच, तुमच तुम्ही बघा,मी त्यांना विनंती केली की माझ्याकडे कोर्टाचे आदेश आहे व माझे कायदेशीर काम आहे. त्यानंतर दिघे साहेब यांनी जमीन किती आहे विचारले मी सांगितले एक हेक्टर आहे. दिघे साहेब म्हणाले एक हेक्टर म्हणजे खुप जमीन आहे. त्या लोकांना पाबंद करायचे असेल तर चाळीस हजार रूपये दया, पैसे दिले तर आम्ही कारवाई करू, तेंव्हा मी म्हणालो साहेब सगळ आमच्या बाजुने कोर्टाचे आदेश आहेत जमीन आमच्या ताब्यात आहे फक्त ते आम्हाला शेतीचे काम करत असताना अडथळा करतात. दिघे साहेब म्हणाले पैसे दिल्याशिवाय काही होत नाही अस म्हणत ते लगेच उठले आणि बाहेर आले. ते बाहेर आले व बीट जमादार जोगे यांच्या सोबत बोलत निघून गेले. त्यानंतर मला बीट जमादार जोगे म्हणाले साहेब तुम्हाला थांबा म्हणालेत तुम्ही थोडा वेळ थांबा मी म्हणालो बाहेर जावून नाष्टा करून येतो ते म्हणाले जाऊन या. आम्ही नाष्टा करायला गेलो तेंव्हा थोडया वेळात जोगे साहेबांचा 1 वाजून 39 मिनिटांनी फोन आला आणि म्हणाले लवकर या चर्चा करायची आहे. आम्ही लगेच येतो म्हणालो आम्ही पोलीस स्टेशनला



Scanned with CamScanner

आल्यावर जोगे साहेब दिसत नव्हते मी लगेच 1 वाजुन 41 मिनिटांनी जोगे यांना फोन केला त्यावेळी त्यांनी माझ्या रूम मध्ये या असे सांगितले.

आम्ही दोघे जण जोगे यांच्या रूममध्ये गेलो जोगे साहेब म्हणाले की दिघे साहेबांना चाळीस हजार दयावे लागतील नाही तर समोरची लोक काही करू शकतात असे साहेब म्हणत आहेत असे सांगत माझ्यावर प्रेशर करत होते. त्यामुळे मला भिती निर्माण झाली की पैसे नाही दिले तर माझे काम होणार नाही. व माझे शेतीमध्ये मला अडचण येईल म्हणुन मी नाईलाजास्तव त्यांना होकार देवून तडजोडी अंती वीस हजार रुपये देण्याचे ठरले. तेंव्हा जोगे साहेब म्हणाले की ठीक आहे. मग पैसे दया मी म्हणालो आता सोबत पैसे नाहीत तेंव्हा जोगे साहेब म्हणाले की पैसे कुठे आहेत मी म्हणालो मालेगाव येथील बॅकेत आहेत. तेंव्हा जोगे साहेब म्हणाले की लवकर घेवून या किंवा ऑनलाईन करता येते का बघा तेंव्हा मी त्यांना माझ्याकडे फोन पे आहे असे म्हणालो. तेंव्हा जोगे साहेब यांनी त्यांचे मोबाईल फोनवरून फोन केला व समोरच्या व्यक्तीला सांगितले की तुमच्या फोन पे वर वीस हजार रुपये येतील असे सांगितले त्यानंतर लगेच जोगे साहेब यांनी मला 8956518145 हा नंबर दिला. या नंबर वर वीस हजार रुपये फोन पे करा असे सांगितले.

त्यानंतर मी लगेच माझे फोन पे नंबर 9422701001 या नंबर वरून जोगे साहेब यांनी दिलेला फोन पे नंबर 8956518145 ह्या नंबर वर 01 वाजून 52 मिनीटानी वीस हजार रूपये ट्रान्सफर केले. फोन पे व्दारे पैसे ट्रान्सफर केलेला दिनांक02जुलै 2024 रोजी ट्राजेंक्शन आयडी. T2407021352339008916595/ UTR:455007618666 या प्रमाणे पाठविण्यात आलेले पैसे जोगे यांना दाखवले. जोगे साहेब आणि समोरचा व्यक्ती शेरीकर यांचे बोलणे झाले समोरच्या व्यक्तीने पैसे आले म्हणुन जोगे साहेब यांना फोन करून सांगितले.

त्यानंतर जोगे साहेबांनी आम्हाला इथेच बसा मी साहेबांकडे जाऊन पैसे पोहोचले म्हणुन सांगतो थोडयात वेळात जोगे साहेब आले आणि दिघे साहेब कामात आहेत तुम्ही बसा असे म्हणाले. यानंतर दोन तासांनी 3 वाजुन 52 मिनिटांनी जोगे साहेबांचा फोन आला की दिघे साहेब बोलवलेत असे म्हणाले. आम्ही दिघे साहेब यांच्या कॅबिनमध्ये जाऊन त्यांच्या समोर बसलो. दिघे साहेबांनी मी ज्या लोकांबदल तक्रार दिली होती त्यांना कॅबिनमध्ये बोलावून घेतले व माझे कागदपत्र बघितले आणि त्या समोरील लोकांना सांगितले की यांच्याकडे कोर्टाचे आदेश आहेत. तुम्ही त्या शेतात जाऊ नका मग लगेच बीट जमादार जोगे यांना बोलून घेतले आणि या व्यक्तींना 149 ची नोटीस द्या आणि पाबंद करा असं सांगितले.

त्यानंतर दिघे साहेब यांनी मला म्हणाले की तुम्ही पेरणी करून घ्या. त्यानंतर आम्ही उठुन बाहेर आलो. थोडया वेळात दिघे साहेबांनी मला परत बोलवले व मला सांगितले की पहिले वीस हजार रूपये जोगे यांच्याकडून मिळाले बाकीच्या पैशाचे कस,,,,, मी त्यांना म्हणालो एकढे पैसे दिलेत साहेब सगळे नियमान आहे. कायद्याने माझ्याबाजूने निर्णय दिला आहे. दिघे साहेब म्हणाले बाकीचे पैसे घ्यावे लागतील. तेंव्हा मी म्हणालो पेरणी करून घेतो मग बघू. तेंव्हा दिघे साहेब म्हणाले ठीक आहे. त्यानंतर दिनांक 3 जूलै 2024 रोजी मी शेतात पेरणी करण्यासाठी गेलो असता ज्या लोकांना पोलीसांनी कोर्टाच्या मनाई आदेश बाबत पाबंद केले होते ती मंडळी शेतात येऊन पेरणी अडवून माझा गळा दाबून माझावर जीवघेणा हल्ला केला. या बाबतची तक्रार मी पोलीस ठाण्यात जाऊन दिली. मात्र मी राहिलेले पैसे दिले नाहीत म्हणुन माझ्या तक्रारीवर गुन्हा दाखल केला नाही. उलट समोरच्या लोकांची बाजू घेवून माझ्यावरच खोटा गुन्हा नोंद केला.

त्यानंतर माझे लक्षात आले की दिघे साहेब व जोगे साहेब यांना माझेकडून सदरच्या कामाकरीता कोणतेही पैसे घेण्याचा अधिकार नाही त्यांनी घेतलेली पैसे हे लाच असल्याचे माझ्या लक्षात आल्यावर मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नांदेड येथे तक्रार दिली. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नांदेड यांनी मी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन अर्ज क्रमांक 121/2024 असा क्रमाक देवून चौकशी चालु केली. त्या अनुषंगाने ला.प्र.वि कार्यालय येथील अधिकारी यांनी माझे तक्रारी बाबत माझेशी विचारपुस केली.

तरी 1.संकेत वसंतराव दिघे सहायक पोलीस निरीक्षक 2. दिपक प्रल्हादराव जोगे पोहेकाँ 3. शरद रामदास शेरीकर (खाजगी ईसम) यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करून व माझ्यावर प्रभाव निर्माण करून स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता माझ्या शेतीमध्ये वाद घालणारे लोकांना पाबंद करण्याकरीता व प्रतिबंधक कार्यवाही करण्याकरीता माझेकडुन दिनांक 02 जुलै 2024 रोजी फोन पे व्दारे वीस हजार रूपयेची लाच स्विकारली आहे म्हणुन यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील प्रमाणे घेतलेला फिर्यादी जबाब संगणकावर टंकलिखीत करून त्याची प्रिंन्ट काढल्यानंतर तो मी वाचुन पाहिला असता मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
sanjay abhimanyu walse
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DGPPSAWM6801
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सही)

**Name** (नाव): SANKET VASANTRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 1234



Scanned with CamScanner